श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे

# दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर

ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

(नॅक पुनर्मूल्यांकन - 'ब' श्रेणी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत

इतिहास विभाग आयोजित

## राज्यस्तरीय चर्चासत्र

# मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय इतिहास

(शनिवार दि. ४ फेब्रुवारी २०१७)


✲ संपादक ✲
प्रा. राजू घोलप

✲ आयोजक ✲
प्राचार्य डॉ. राजधर टेमकर

✲ सहसंपादक ✲
प्रा. आसाराम देसाई





ISBN -978-93-83401-46-8

Scanned with CamScanner

श्री. बाबापाटील राजळे शिक्षणसंस्थेचे

# दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय

आदिनाथनगर,ता.पाथर्डी, जि.अहमदनगर

(नॅक पुनर्मूल्यांकन - 'ब' श्रेणी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत

इतिहास विभाग आयोजित

राज्यस्तरीय चर्चासत्र

# मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय इतिहास

(शनिवार दि.४ फेब्रुवारी २०१७)

आयोजक

प्राचार्य डॉ.राजधर टेमकर

संपादक

प्रा.राजू घोलप

सहसंपादक

प्रा.आसाराम देसाई



Scanned with CamScanner

| अ.क्र. | शोधनिबंध | संशोधकाचे नांव | पृ.क्र. |
| --- | --- | --- | --- |
| २१ | शिवकाळातील-अंतर्गत व्यापाराचे योगदान | प्रा. संदिप बाबासाहेब राजभोज | ८६ ते ९० |
| २२ | मराठेकालीन गावगाडयाचे शिलेदार : बलुतेदार व फिरस्ते | प्रा. किरण सर्जेराव पवार | ९१ ते ९४ |
| २३ | मराठेकालीन जातिव्यवस्था | प्रा. रमेश अंबऋषी शितोळे | ९५ ते ९७ |
| २४ | मराठयांचा सामाजिक इतिहास | प्रा. नंदु पेत्रस सदाफळ | ९८ ते १०१ |
| २५ | मराठा मंडळाच्या काळातील मराठी सत्तेचा विस्तार: एक अभ्यास | प्रा. सचिन गोवर्धन कांबळे अजित लक्ष्मण भालसिंग | १०२ ते १०४ |
| २६ | मराठा कालीन समाज आणि दैनंदिन जीवन पध्दती: एक अभ्यास | प्रा. अभिमन्यु भास्कर गायकवाड | १०५ ते १११ |
| २७ | शिवकालीन जमीन महसूल व्यवस्था | प्रा. शितल अरविंद धरम | ११२ ते ११५ |
| २८ | पेशवेकालीन बँकिंग व्यवस्था (पेढी व्यवहार) | प्रकाश बाबुजी पांढरपिसे | ११६ ते १२० |
| २९ | मराठयांचा सामाजिक इतिहास - जाती व्यवस्था, स्त्रियांची स्थिती, गावगाडा | हेमा गजानन गाभणे | १२१ ते १२६ |
| ३० | मराठेकालीन नाथ संप्रदाय विशेष संदर्भ मढी | संदिप भाऊसाहेब फ़ाखरे | १२७ ते १३० |
| ३१ | सरसेनापती उमाबाई दाभाडे यांचे सामाजिक व धार्मिक कार्य | कदीर कासम शेख | १३१ ते १३२ |
| ३२ | सरलष्कर नारायणराव पाटणकर यांना कर्नल वेलस्ली यांनी पाठविलेले इ.स. १८०३ चे पत्र | अमोल दिनकर गायकवाड | १३३ ते १३८ |
| ३३ | १७ व्या शतकातील शिवकालीन चलन | मन्सुर महमद सुतार | १३९ ते १४३ |
| ३४ | शिवकालीन प्रशासनाची सामाजिक सर्वसमावेशकता | मोना लक्ष्मण दळवी | १४४ ते १४६ |
| ३५ | शिवकालीन चलनव्यवस्था : एक अभ्यास | योगिता अशोक बारहाते | १४७ ते १५० |
| ३६ | शिवकालीन मुलकी प्रशासन | प्रा. जी.टी. अकोलकर | १५१ ते १५३ |




Scanned with CamScanner

# मराठा मंडळाच्या काळातील मराठी सत्तेचा विस्तार: एक अभ्यास

प्रा. सचिन गोवर्धन कांबळे
भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान
वाणिज्य महाविद्यालय, वाघोली
फोन : ९६२३६७९४५०

अजित लक्ष्मण भालसिंग
संशोधक विद्यार्थी
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
फोन: ९९६०७०६९२८

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मराठा स्वातंत्र्ययुध्दामध्ये मराठा मंडळ अस्तित्वात आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात बाळाजी विश्वनाथ व पहिला बाजीराव यांच्या प्रयत्नामुळे हे मंडळ अधिकच बळकट व विस्तारवादी बनले. मराठा राज्याचे संरक्षण व विस्तार करणे या तत्वास अनुसरूनच मराठी मंडळाचा उदय झाला होता. मुळातच छत्रपती संभाजी महाराजांच्या मुत्यूनंतर औरंगजेबाने मराठी सरदरांना जहागिरीचे अमिष दाखवून आपल्या बाजूस वळवून घेण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता. छत्रपती शाहू व ताराबाईच्या काळात मराठा सरदारांचे महत्व वाढले या संघर्षाचा फायदा घेवून मराठा सरदार बंड करू लागले. अष्टप्रधान मंडळाची अवस्थाही दुबळी बनलेली होती. त्यामुळेच मराठा सरदारांना पराक्रमासाठी नवे क्षितीज निर्माण करून देणे ही काळाची गरज बनलेली होती. हे लक्षात घेवून बाळाजी विश्वनाथ याने मराठा मंडळाची योजना तयार केली होती.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातुन मराठा मंडळाच्या काळात मराठी सत्तेचा विस्तार व विविध मराठी घराण्यांचा पराक्रम व त्यांचे कार्य यावर प्रकाश टाकला आहे.

मराठी मंडळाचा विस्तार व मराठी सरदारामध्ये ऐक्य निर्माण करणे हाच उद्देश समोर ठेवून मराठा मंडळाचा उदय झालेला होता. मराठी सरदारांना प्रदेश वाटून देवून त्या प्रदेशातून चौथाई व सरदेशमुखी वसुल करण्याचे अधिकार बहाल केले गेले. त्यासाठी त्यांना स्वतंत्र्य फौजा उभारण्याची परवानगी दिली. यातुनच मराठा राज्याला सामर्थ्यशाही बनविण्यासाठी,आपापसात वतनासाठी भांडत असलेल्या शुर मराठा सरदारांना कर्तृत्वाची नवि दिशा दाखवणे ही काळाची गरज ओळखून बाळाजी विश्वनाथ याने संघटित केले. यातुनच सामर्थ्यवान मराठा मंडळाचा उदय प्रत्यक्षात आला. स्वराज्याचे रूपांतर साम्राज्यात होवून संपूर्ण भारतभर मराठयांचे वर्चस्व, दरारा निर्माण झाला प्रत्यक्ष मोगल बादशाहस मराठयांच्या मदतीची गरज पडली[१]

मराठी सरदारांची कार्यक्षमता ओळखून स्वतंत्र प्रांत व जहागिरी कायम ठेवली विशेष म्हणजे नवीन सरदारांना नविन प्रांत देणे बहूमानांचा सन्मान देवूंन मराठा साम्राज्याविषयी प्रथमत: अस्था निर्माण केली उदा: 'खडेराव दभाडे यांस सेनापती, परसोजी भोसले यास 'सेनासाहेब सुभा' अशा पदव्या बहाल करून त्यांना खानदेश व वऱ्हाडमधील जहागिरी कायम केली. उदाजी पवार यास माळव्यात फत्तेसिंग भोसले अक्लकोट, अशा विविध


ISBN. : 978-93-83401-46-8


Scanned with CamScanner

जहागिरवर मराठा सरदारांची नियुक्ती करून त्या प्रांतातुन चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्याचे स्वतंत्र्य अधिकार त्यांना बहाल केल्यामुळे स्वत:चे अस्तित्व टिकवणे व मराठी राज्यासाठी लढणे यावर मराठा मंडळातील सरदारांचा विश्वास ठाम होत गेला. त्यातूनच शिवाजी महाराजांची परंपरा,सत्तेच्या समतोलाची जाणीव वतनाबद्दल प्रेम, ठराविक लष्कर ठेवून मध्यवर्ती सत्ता बोलविल त्यावेळी हजर राहण्याची सक्ती यामूळे मंडळाचे ऐक्यभाव वाढीस लागला.[२] त्यातुनच पुढे विविध घराण्यांची स्वत:च्या पराक्रमाने गुजरात, माळवा, राजपूताना,बुंदेलखंड, गोडवन,ओरिसा व इतर भाग आपल्या नियंत्रणाखाली आणले. त्यातुनच भावी काळात मराठी सत्तेचा दबदबा निर्माण करणारे भोसले, शिंदे, होळकर, गायकवाड इत्यादी सरदारांचा उदय पुढे बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीत झाला. त्यांनी आपापल्या घराण्यांच्या सत्ता मराठा मंडळाच्या धोरणानुसार भारतातील विविध प्रांतात प्रस्थापित केल्या.[३]

बाजीराव पेशव्याच्या काळात उत्कर्षास पावलेले नागपूरचे भोसले घराणे, मराठयांच्या स्वांतत्र्यसंग्रामातुन नावारूपास आले. याच घराण्यातील परसोजी भोसले याने मराठा स्वातंत्र्य संग्रामध्ये अलौकिक पराक्रम गाजविला राजाराम याने त्यास 'सेनासाहेब सुभा' हे पद दिले पुढे याच घराण्यामध्ये रघुजी भोसले याने मराठी सत्तेच्या विस्तारात मोठी कामगिरी केली. बाजीराव यांच्या कारकिर्दीत १७३० ते १७४० या काळात रघुजीने गोंडवनात व दक्षिणेकडे विलक्षण पराक्रम गाजविला. १७३८ मध्ये शाहूने रघूजीस सनद देवून लखनौ बुंदेलखंड, अलाहाबाद, दाजीपूर पाटणा, देवगड, भवरगड, चांदा इ. प्रांतावर मराठयांचे वर्चस्व मिळवले तर त्याच्याच काळात कनार्टक प्रांतावरी मराठी सत्ता विस्तारास गेली.[४] याशिवाय मराठा मंडळातील शिंदे घराण्यांनी मोठी कामगिरी मराठी सत्तेच्या विस्तारासाठी केली. १७३९ मध्ये बाजीराव याने भोपाळ या ठिकाणी निजामाचा पराभव केला. त्यावेळी प्रत्यक्ष राणोजी शिंदे हजर होता. १७३५ च्या मोहिमेस खानदुरान व वजीर कमरूद्दीन याचा पराभव करून मोवलांकडून २२ लाख दंड वसूल केला मराठयांच्या उत्तरेकडील साम्राज्य विस्तारात राणोजी व त्यानंतर पुढे जयाप्पा शिंदे यांनी मोठे सहकार्य केले.[५]

शिंदे घराण्याप्रमाणेच १७३५ मध्ये राणोजी शिंदे याच्या मदतीने मल्हारराव होळकर यानेही माळव्याच्या लढाईत पराक्रम गाजविला गनिमी कावा या युध्दतंत्राचा वापर करून उत्तर प्रांतात मराठी सत्ता विस्तारण्याचे श्रेय मल्हारराव होळकर यास दिले जाते. याशिवाय याच काळाच्या दरम्यान गायकवाड घराण्याचाही मराठी सत्तेच्या विस्तारात मोठा सहभाग ठरला. १७५० पर्यत या घराण्यानेही मराठा राज्य विस्तारण्यासाठी मोठे प्रयत्न केले. शिंदे ,होळकर, भोसले, गायकवाड या सरदाराप्रमाणेच मराठा मंडळात पवार, बुंदेले, आग्रे इ. घराण्यांनी बाजीराव पेशव्याच्या काळात मराठी सत्ता विस्तारण्याचा प्रामानिक प्रयत्न केला. गुजरात, माळवा, राजपुताना, गोंडवन,ओरिसा व इतरही भाग मराठयांनी आपल्या वर्चस्वाखाली आणल शिंदे,होळकर, गायकवाड,, भोसले, शिंदे, बुंदेले हे उत्तरेती ल


ISBN. : 978-93-83401-46-8


Scanned with CamScanner

मराठयांच्या सत्तेचे रक्षकच बनले. पानिपतच्या अनर्थकारक युध्दानंतरही मराठा मंडळाने पूर्वीचे स्थान परत मिळवण्याचा प्रयत्न केला. महादजी शिंदे इ.स १७८२ मध्ये झालेल्या सालबाईच्या तहात टिकाव धरू शकला प्रत्यक्ष मोगल बादशाहा आपल्या ताब्यात ठेवू शकला.[६]

दक्षिणेतही मराठी सत्तेच्या विस्तारात मराठा मंडळाच्या हालचालीच कारणीभूत ठरल्या सवणुरचा नवाब इक्केरीचे नायक, सीराचा राजा या सारख्या सरदारांवर मराठयांनी वर्चस्व मिळवले. त्यानंतर हैदर व टिपू सुल्तान यांच्या सामर्थ्यालाही अव्हान देवू लागले. जवळजवळ उत्तर कर्नाटक मराठयांच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखाली आणण्यात हे मंडळ यशस्वी झाले.

प्रत्यक्ष या मंडळाच्या काळात मराठी सत्ता ही नावारूपास आली मात्र नानासाहेब पेशव्याच्या काळात मात्र सत्तावर्चस्व, चौधाई,खंडणी यामुळे सत्ता समतोलाचा अभाव, नव्या जुन्या सदस्यामधील मतभेद, मध्यंवर्ती नियंत्रणाचा अभाव, वतनदारी पध्दतीमुळे मराठा सरदरात फुटिरता अधिकच वाढत गेली. माधवराव पेशव्याच्या मुत्युनंतर मराठा मंडळाचे नेतृत्व सांभाळण्याची कुवत पेशव्यात राहीली नाही. इंग्रजांची घेतलेली मदत या सर्वच कारणामुळे मराठा मंडळाचा ऱ्हास घडुन आला. असे जरी असले तरीही बाळाजी विश्वनाथ पासुन ते माधवराव पेशव्याच्या काळापर्यंत मराठी सत्तेच्या विस्तारात मराठा मंडळाचे मोठे यश म्हणावे लागेल.

संदर्भ व तळटिपा:—

१) मोरे अरूणा,डॉ नवथर भारती, मराठयांचा इतिहास अथर्व प्रकाशन, पुणे, प्रथमावृती २०१० पृष्ठ.क्र १८३

२) कित्ता, मराठयांचा इतिहास पृष्ठ क्र.१८८

३) डॉ. कुलकर्णी अ.रा. मराठयांचा इतिहास १७०७ ते १८१८ भाग दुसरा, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे व्दितीय आ.१९९५

४) कित्ता पृष्ठ क्र. ३३

५) पूर्वोक्त, मराठयांचा इतिहास, पृष्ठ क्र. १९०

६) पूर्वोक्त, मराठयांचा इतिहास, पृष्ठ क्र. १९२


ISBN. : 978-93-83401-46-8


Scanned with CamScanner